1-0 प्रत

पोलीस ठाणे वैजापूर छत्रपती संभाजीनगर ग्रामीण

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** औरंगाबाद ग्रामीण **P.S.(ठाणे):** वैजापूर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0302 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 18/06/2025 18:10

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिनांक पासून):** 18/06/2025
**Time Period (कालावधी):** पहर 4 **Date To ( दिनांक पर्यंत):** 18/06/2025
**Time From (वेळेपासून):** 11:27 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 11:27 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 18/06/2025 **Time (वेळ):** 18:02 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामच्या संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 038

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 18/06/2025 18:02 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 11 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** चैतन्य टी हाऊस, जरुळ फाटा,खंडाळा-वैजापुर रोड, ,वैजापूर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then**
(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

10 T

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): निळकंठ विठ्ठल ओंबासे उप सरपंच भायगाव

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1974

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | भायगाव, तावैजापुर,वैजापूर,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | भायगाव, तावैजापुर,वैजापूर,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9860894545

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | विजयकुमार पंडितराव क्षिरसागर ग्रामसेवक भायगाव ग्रामपंचायत | | | 1. म्हाडा कलनी, शहानुरवाडी,, औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इनक्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

**S.No.** (अ.क्र.) **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.)

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दिनांक 18/06/2025

मी मिठ्ठकरु विठ्ठल तोंबरे वय- 51 वर्ष, व्यवसाय- शेती (उप सरपंच भायगाव) रा.भायगाव, ता.वैजापुर, जि. छत्रपती संभाजीनगर मो.क्र.9860894545.
समक्ष फिर्याद देतो की, मी दिनांक 18/06/2025 रोजी समक्ष खंडाळा - वैजापुर रोड, ता.वैजापुर, जि.छत्रपती संभाजीनगर येथे सुरक्षीत ठिकाणी हजर राहुन लाच मागणीची तक्रार दिली की,
मी दिनांक 17/06/2025 रोजी माझ्याकडे होत असलेल्या लाच मागणी बाबत फोनव्दारे पोलीस उप अधीक्षक श्रीमती पाटील मॅडम अँन्टीकरप्शन ब्युरो कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना कळविले होते त्यावरुन श्रीमती पाटील मॅडम या आज रोजी त्यांचे पथकासह येऊन मला भेटल्याने मी समक्ष खंडाळा- वैजापुर रोड ता.वैजापुर, जि. छत्रपती संभाजीनगर, येथील सुरक्षीत ठिकाणी हजर राहुन तक्रार देतो की, मी वरील ठिकाणी राहणार असुन शेती व्यवसाय करतो तसेच मागील 4 वर्षापासुन मी भायगाव येथील उप सरपंच पदावर कार्यरत आहे. आमचे गावाकरीता जन सुविधा योजने मधुन नविन स्मशानभुमी उभारणे करीता ग्रामपंचायत ठराव घेऊन सदर काम ग्रामपंचायत व्दारे करण्याची व सदर कामा करीता 7,00,000/- रुपये खर्चाची मंजुरी आर्थिक वर्ष-2023-24 करीता माहे फेब्रुवारी-2024 मध्ये देण्यात आली होती. सदर काम हे ग्राम पंचायत मार्फत करायचे असल्याने सदर काम हे सरपंच, ग्रामसेवक यांनी माझे व ग्रामपंचायत सदस्यांचे निगराणीने माहे मार्च 2025 मध्ये पुर्ण करुन घेतले, सदर कामाचे एकुण बील 6,96,612/- रुपये झाले असुन कामाची एम.बी. व इतर महत्वाचे कागदपत्र पंचायत समितीचे इंजीनीयर यांनी तयार करुन ग्राम्सेवक क्षिरसागर यांचे कडे दिले व सदर बिले ग्रामसेवक क्षिरसागर यांनी पंचायत समितीमध्ये पाठवुन बिलांची मंजुरी आल्यानंतर ग्रामसेवक क्षिरसागर यांनी एकुण बिलाचे रक्कमे पैकी सुमारे 5,81,820/-(पाच लाख एक्यांशी हजार आठशे विस) रुपयांचे चेक पुर्वी सदर काम केलेले संबंधीत मजुर व दुकानदार यांना दिले आहेत. परंतु सदर रक्कमे पैकी 94,680/- रुपये रक्कमेचे चेक बाकी असल्याने संबंधीत दुकानदार व मजुर हे मी सदर काम त्यांच्याकडुन करुन घेतल्यामुळे माझ्याकडे त्यांचे साहित्याचे व मजुरीचे बिलाचे चेक ग्रामसेवक यांचे कडुन घेऊन देण्याकरीता माझ्यामागे तगादा लावत होते. त्यामुळे मी ग्रामसेवक क्षिरसागर यांना दिनांक 17/06/2025 रोजी भेटुन उर्वरीत 94,860/- रुपयांचे चेक देण्याबाबत विनंती केली असता त्यांनी सदर बिलांचे चेक देण्याकरीता मला 15,000/- रुपये द्यावे लागतील असे सांगुन माझ्याकडे 15,000/- रुपये लाचेची मागणी केली त्यावर मी त्यांना मी उर्वरीत रक्कमेचे चेक अदा करण्याची विनंती केली त्यावर क्षिरसागर ग्रामसेवक हे मला पैसे दिल्याशिवाय चेक देणार नाहीत असे म्हणाले. त्यावेळी मी ना इलाजाने त्यांना बघतो असे म्हणुन निघुन आलो.
ग्रामसेवक क्षिरसागर हे मागत असलेले पैसे हे लाच म्हणुन मागत असल्याची मला खात्री आहे, माझा व ग्रामसेवक क्षिरसागर यांचा कोणताही पैसे देणे घेण्याचा व्यवहार नाही व वैर किंवा दुशमनी नाही. तसेच मला ग्रामसेवक क्षिरसागर यांना लाच देण्याची इच्छा नाही.
मी आज दिनांक 18/06/2025 रोजी माझे मित्र रामदास तोंबरे यांचे सह ग्रामसेवक क्षिरसागर यांना भेटण्यास जाणार आहे त्यावेळी ग्राम्सेवक क्षिरसागर यांनी माझ्या वरील कामा करीता माझ्याकडे लाचेची मागणी करुन स्वत: किंवा इतरां मार्फत लाच स्विकारल्यास त्यांचे विरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात यावी हि विनंती.
त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्रीमती संगीता पाटील यांनी मी दिलेली तक्रार उपस्थित असलेले त्यांच्या सोबतचे दोन शासकीय पंचास वाचण्यास दिली पंचानी ती तक्रार वाचल्या नंतर त्यावर पंचानी सहया केल्या व पोलीस उप अधिक्षक संगीता पाटील यांनी समक्ष म्हणुन सही केली.
त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्रीमती संगीता पाटील यांनी मी दिलेल्या लाच मागणीचे तक्रारीचे अनुषंगाने प्रथम

लाचमागणी पडताळणी करण्याचा निर्णय माझे व पंचांच समक्ष घेतला. त्या प्रमाणे लाचमागणी पडताळणी संदर्भात त्यांनी मला व पंचास तसेच पथकातील सदस्यांना आवश्यक सुचना देल्या. तसेच सदर लाचमागणी पडताळणीमध्ये डिजीटल व्हाईस रेकॉर्डरचा वापर करण्यात येणार असल्याचे मला सांगीतले. त्यावेळी मला ग्रामसेवक क्षिरसागर यांचा फोन आला व ते मला म्हणाले की मी जरुळ फाटा येथे आला आहे तुम्ही पण इतेच या त्यावर मी त्यांना 10-15 मीनीटात आलो असे म्हणालो.
त्यानंतर पोलीस उप अधीक्षक संगीता पाटील मॅडम यांनी मला, माझे मित्र रामदास ठोंबरे व पंच क्र.1 श्री.श्याम बहोत यांना सुचना देल्या तसेच व्हॉईस रेकॉर्डर मध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन मी, माझे मित्र रामदास व पंच यांना ग्रामसेवक क्षिरसागर यांची भेट घेण्या करीता माझ्या खाजगी वाहनाने आम्ही थाबलेल्या सुरक्षीत ठिकाणा वरुन 10.17 वा. रवाना केले त्यानंतर आम्ही खंडाळा-वैजापुर रोड वरील जरुळ फाटा येथे गेलो व ग्रामसेवक क्षिरसागर यांची भेट घेतली व माझे कामा संदर्भात चर्चा केली असता सदरवेळी ग्रामसेवक हे मला म्हणाले की तुम्हाला आता जिएसटी व इतर टॅक्स कट होऊन फक्त 66,662/- रुपयांचे चेक मिळतील असे सांगीतले त्यावेळी मी ग्रामसेवक क्षिरसागर यांना म्हणालो की, आता याचं कस करायचं, त्यावर क्षिरसागर हे म्हणाले की काल ठरल्या प्रमाणे त्यावर मी त्यांना किती करायच सांगा असे म्हणालो त्यावर क्षिरसागर हे थोडे वश कमी करा असे म्हणाले त्यावर मी म्हणाले की किती दहा मधुन का पंधरा मधुन त्यावर क्षिरसागर यांनी ठिक आहे, दहा करुन टाका असे म्हणुन माझ्या कडे तडजोडी अंती 10,000/- रुपये लाचेची मागणी केली व लाचेची रक्कम लगेचच घेऊन येण्याचे सांगीतले. त्यामुळे मी व पंच असे सापळा पथक थांबलेल्या सुरक्षीत ठिकाणी परत आला.

तेथे पोलीस उप अधीक्षक पाटील मॅडम यांनी पंचा समक्ष माला घडलेल्या घटने बाबत विचारणा करुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन त्यामधील संभाषण ऐकले असता त्या मध्ये आलोसे ग्रामसेवक क्षिरसागर यांनी माझ्याकडे माझे कामासबंधी चर्चा करुन माझ्या कडे तडजोडी अंती 10,000/- रुपये लाच मागणी केल्याचे व लाचेची रक्कम सदर ठिकाणी लगेचच घेऊन येण्याचे स्पष्ट झाले.
त्या अनुषंगानेलगेचच जरुळ फाटा येथे सापळा कारवाई आजमावण्याचा निर्णय घेऊन ग्रामसेवक क्षिरसागर यांना लाच म्हणुन देण्याची रक्कम रु.10,000/- ज्यामध्ये 500 रुपये दराच्या 20 चलनी नोटा मी पोलीस उप अधीक्षक. संगीता पाटील यांचे समक्ष हजर केल्या सदर नोटांचे क्रमांक एका कागदावर लिहुन सदर कागद पंच क्र.2 श्री कदम यांचे कडे देण्यात आला व लाचेच्या रक्कमेस अँथ्रासिन पावडर लाऊन सदर रक्कम माझ्याकडे दिली व व्हॅइस रेकॉर्डर मध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन माझ्या कडे दिले त्यानंतर मी व पंच ग्रामसेवक क्षिरसागर यांची भेट घेण्याकरीता सुरक्षीत ठिकाणा वरुन 11.21 वा. रवाना झालो. जरुळ फाटा येथे पोहोचल्या नंतर माझी, ग्रामसेवक क्षिरसागर यांची भेट झाली त्यावेळी मी माझ्या शर्ट चे खिशातील लाचेची रक्कम काढुन ग्रामसेवक क्षिरसागर यांचे समक्ष धरली व हे ध्या दहा हजार हे मोजुन घ्या असे म्हणालो त्यावर क्षिरसागर यांनी सदर रक्कम त्यांचे उजव्या हाताने स्विकारुन न मोजता त्यांचे पँटचे समोरील उजव्या बाजुच्या खिशामध्ये ठेऊन घेतली. त्यावेळी मी सापळा पथकास दिसेल अशा रितीने लाच स्विकारले बाबतचा पुर्व नियोजीत इशारा केला. ती वेळ 11.27 वा. ची होती त्यावर लागलीच सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी पंच क्र.2 असे सदर घटनास्थळी आले.
त्यानंतर सापळा पथकाने ग्रामसेवक क्षिरसागर यांना ताब्यात घेतले त्यानंतर पो.उप.अधी. पाटील मॅडम यांचे सुचनेवरुन ग्रामसेवक क्षिरसागर यांनी स्विकारुन त्यांचे पँटचे खिशात ठेवलेली लाचेची रक्कम 10,000/- रुपये पंच क्र.2 श्री.कदम यांनी हस्तगत केली व सापळा पुर्व कारवाईचे वेळी लिहीलेले नोटांचे क्रमांक व ग्रामसेवक क्षिरसागर यांचे कडुन ताब्यात घेतलेल्या लाचेच्या रक्कमेच्या नोटांचे क्रमांक तपासुन पाहीले असता सदर नोटा सारख्याच असल्याची सापळा पथकाची खात्री झाली.
त्यानंतर ग्रामसेवक क्षिरसागर यांना पोलीस उप अधिक्षक श्रीमती संगीता पाटील यांनी स्वत:चा परिचय देवुन त्यांना त्यांचे संपुर्ण नाव गाव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव विजयकुमार पंडितराव क्षिरसागर वय-53 वर्ष, पद-ग्रामसेवक (ग्राम पंचायत अधिकारी), भायगाव ग्रामपंचायत, ता.वैजापुर, जि.छत्रपती संभाजीनगर रा.39, म्हाडा कॉलनी, शहानुरवाडी, जि.छत्रपती संभाजीनगर असे सांगीतले.
करीता दिनांक 18/06/2025 रोजी लाचमागणी पडताळणी दरम्यान ग्रामसेवक विजयकुमार क्षिरसागर यांनी ग्रामपंचायत भायगाव अंतर्गत जन सुविधा योजनेतुन उभारण्यात आलेल्या नविन स्मशानभुमीचे ग्रामपंचायत व्दारे केलेल्या कामाचे उर्वरीत 94,680/- रक्कमेचे चेक देण्याकरीता माझ्या कडे पंच/ साक्षीदारा समक्ष तडजोडी अंती 10,000/- रुपये लाचेची मागणी करुन व सदर लाच रक्कम आज दिनांक 18/06/2025 रोजी 11.27 वा. चैतन्य टी हाऊस, जरुळ फाटा, खंडाळा-वैजापुर रोड, ता.वैजापुर, जि.छत्रपती संभाजीनगर येथे स्वत: स्विकारली म्हणुन माझी ग्रामसेवक विजयकुमार पंडितराव क्षिरसागर वय-53 वर्ष, पद-ग्रामसेवक, भायगाव ग्रामपंचायत, ता. वैजापुर, जि.छत्रपती संभाजीनगर रा.39, म्हाडा कॉलनी, शहानुरवाडी, जि.छत्रपती संभाजीनगर यांचे विरुध्द

कायदेशिर फिर्याद आ[illegible]
माझी वरील फिर्याद माझे सांगणे प्रमाणे संगणकावर [illegible] टंकलिखित केली असुन ती मी वाचुन पाहीली बरोबर व खरी आहे.

हि फिर्याद दिली

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरुन अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Satyajeet Sudhakar Taitwale(I (Inspector)) / PI **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिकाऱ्याचे नाव):
[illegible]
**Rank (पद):** [illegible] **No.(क्र.):**

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणाऱ्याची सही/अंगठा)

15 **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयास पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** Satyajeet Sudhakar
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PI